# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

<u>**प्रसिद्धी पत्रक ता. १० मार्च २०१९**</u>

# मनपा क्षेत्रातील ७० टक्के बालकांना पोलिओ डोज

**नागपूर, ता. १० :** राष्ट्रीय पल्स पोलिओ अभियानाअंतर्गत नागपूर महानगर पालिका क्षेत्रात आज (ता. १०) एक लाख ९५ हजार १४८ बालकांना पोलिओचा डोज पाजण्यात आला.

पोलिओ रविवार अंतर्गत नागपूर महानगर पालिका क्षेत्रात मोहिमेचा शुभारंभ स्व. प्रभाकरराव दटके रोग निदान केंद्रात महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते बालकाला पोलिओ डोज पाजून करण्यात आला. यावेळी आरोग्य सभापती मनोज चापले, नगरसेविका सरला नायक, श्रद्धा पाठक, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, आरोग्य विभाग नागपूर मंडळाचे सह उपसंचालक डॉ. धकाते, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सरिता कामदार, पल्स पोलिओ नोडल अधिकारी डॉ. सुनील धुरडे, समन्वयक डॉ. विजय जोशी, डॉ. विजय तिवारी, डॉ. नरेंद्र बहिरवार, डॉ. ख्वाजा, दीपाली नागरे उपस्थित होत्या.

याप्रसंगी बोलताना महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, अभियानादरम्यान शहरातील एकही बालक पोलिओ डोज शिवाय राहायला नको. अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात १२ ते १६ मार्च दरम्यान घरोघरी जाऊन रविवारी डोज न घेतलेल्या बालकांना डोज पाजण्यात येईल. निरोगी भविष्यासाठी हे अभियान महत्त्वाचे असल्याचे त्या म्हणाल्या.

नागपुरात आज विविध केंद्रावर ० ते ५ वर्ष वयोगटातील ७०.६७ टक्के बालकांना पोलिओ डोज पाजण्यात आला. पोलिओ डोज पाजण्यासाठी दोन लाख ७६ हजार १३५ बालकांचे उद्दिष्ट होते. त्यापैकी १ लाख ९५ गजर १४८ बालकांना डोज पाजण्यात आला. मनपाच्या आरोग्य विभागाची चमूने यासाठी परिश्रम घेतले.